|| ॐ ||

# ‘स्व’-रूपवर्धिनी कार्यवृत्त

**मार्च २०२१**

२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे - ४११ ०११.


(कार्यालय दूरध्वनी) : २६१२१७०४ भ्रमणध्वनी : ९०११३८६३८६

Email : wardhinee@gmail.com

Website : http://www.swaroopwardhinee.org

## ‘२९ मार्च - राष्ट्रीय नौकादिन’

**भारतीय आरमाराचे आद्य प्रणेते छत्रपती शिवाजी महाराजांचे आरमार.**



राष्ट्रीय नौका दिनानिमित्ताने (२९ मार्च)
भारतीय आरमाराचे आद्य प्रणेते छ. शिवाजी महाराज
(तिथीप्रमाणे जयंती फाल्गुन कृष्ण ३) यांना, व
नौदलातील शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, कामगार, जवान

**सर्वांनाच मानाचा मुजरा !!**




स्वतःच्या नौका स्वतःच विकसित करणाऱ्या भारतीय नौदलाने तयार केलेली संपूर्ण देशी बनावटीची अत्याधुनिक

**‘INS करंज’ पाणबुडी**

भारतीय नौदलात १० मार्च २०२१ ला दाखल झाली.

पाण्यात जास्त काळ राहू शकणारी, क्षेपणास्त्रांनी सुसज्ज असणारी, पाण्यात फारसा आवाज न करता वेगवान हालचाली करू शकणारी, सायलेंट किलर म्हणून ओळखली जाणारी ही पाणबुडी !

# ✻ समुपदेशन विभाग ✻

### ✻ बुद्धिमापन चाचणी -

| दिनांक | शाखा | मुलांची संख्या |
|---|---|---|
| १३ फेब्रु. | स्वामी दयानंद सरस्वती | ६० |
| १७ फेब्रु. | भगिनी निवेदिता | २८ |
| २० फेब्रु. | वीर अभिमन्यू बालशाखा | २० |
| २० फेब्रु. | क्रांतीज्योती सावित्री | १२ |









# ✻ पालकसभा ✻

१३ फेब्रुवारीला स्वामी दयानंद शाखेवर पालकसभा झाली. वर्धकांची घरातील वर्तणूक, भ्रमणध्वनीचा वापर या विषयावर पालकांशी सौ. मेघाताई नगरे यांचा संवाद झाला.

यातील महत्त्वाचे मुद्दे खालीलप्रमाणे -

* मुलांची गरज काय आहे हे ओळखता आले पाहिजे.
* मुलांना शांततेने हाताळले पाहिजे, मारहाण करणे हा पर्याय नाही.
* वयात येताना मुलांशी मैत्रीचे नाते असायला पाहिजे.
* मुलांना जबाबदारी दिली पाहिजे.
* मुलांना सत्य परिस्थितीची जाणीव करून दिली पाहिजे.
* मुलांचे मत जाणून घेतले पाहिजे.

# ✻ पंचकोश विकास सत्र ✻

भाग २ (बिबवेवाडी) निर्माण शाखेतील (११ वी, १२ वी) वर्धकांसाठी दि. २० फेब्रुवारीला राजगड कार्यालयात 'स्व'ची ओळख या विषयावर सौ. मेघाताई नगरे यांनी सत्र घेतले.

'स्व'ची जाणीव या विषयी किती आकलन आहे हे जाणून घेण्यासाठी सुरुवातीला वर्धकांना एक प्रश्नावली देण्यात आली. त्यानंतर परस्परसंवादी (Interactive) पद्धतीने विषय पुढे गेला.

पंचकोशांचे आपल्या दैनंदिन जीवनातील महत्त्व रोजच्या व्यवहारातील विविध उदाहरणे देऊन सोप्या भाषेत सांगण्यात आले. सत्राच्या शेवटी सुरुवातीला सोडवलेली प्रश्नावली परत सोडवून घेण्यात आली. त्यावरून मुलांना आधी किती माहिती होती आणि नंतर किती माहिती समजली याचे विश्लेषण करण्यात आले.

## ❇ कार्यकर्ता प्रशिक्षण ❇

दि. २७ फेब्रुवारीला सर्व शाखा प्रमुखांसाठी 'भ्रमणध्वनी (मोबाईल) माझा साथी' या विषयावर प्रशिक्षण घेण्यात आले. यात कोरोनाच्या महामारीत लहान मुलांपासून ते वृद्धांपर्यंत सगळ्यांचाच भ्रमणध्वनीचा वापर वाढलेला आहे. याचा सकारात्मक वापर कसा करावा, त्याचा अति वापर केल्यामुळे होणारे परिणाम याविषयी तसेच शाखेतील मुलांपर्यंत हा विषय कसा पोहोचवावा याबाबतचे प्रशिक्षण शाखाप्रमुखांना देण्यात आले. एकूण ७ शाखाप्रमुख या प्रशिक्षणाला उपस्थित होते.

## ❇ युवा विभाग ❇

शिक्षण झाल्यानंतर नोकरी शोधताना आवश्यक असणाऱ्या गोष्टींची माहिती देण्यासाठी पुढील सत्र झाले. वक्ते – प्रा. जीवन पाटील (Training and Placement cell officer, MIT ADT University पुणे)

विषय – अभियांत्रिकी क्षेत्रातील कोरोनानंतर भविष्यातील संधी.

मार्गदर्शनातील ठळक मुद्दे –

* भविष्यातील नोकरी संधी आपल्यासाठी निर्माण करावयाच्या असतील तर यंत्र शिक्षण (Machine learning) आभासी प्रतिभा (Artificial Intelligence), स्वयंचलित यंत्र (Automation) याचे प्रगत तंत्रज्ञान अवगत असायला हवे.
* गुणवत्ता गोषवारा (Resume) बाबतीत काही महत्त्वाच्या बाबी लक्षात घेऊन त्यातील बदल व त्यासाठी योग्य पर्याय सुचवले. यात आपल्या विषयाशी निगडित असलेल्या संगणक (Software) ज्ञानाचा उल्लेख गरजेचा आहे. याच्या सोबत सर्व समावेशक पत्र (Cover letter) लिहिण्याची सवय ठेवा.
* आवड असेल आणि मेहनत करायची तयारी असेल तरच स्पर्धा परीक्षेकडे वळा.
* पदवीनंतरचे उच्च शिक्षण घेताना आपली आवड कशात आहे हे ओळखून त्यानुसार निर्णय घ्या.
* अभियांत्रिकी शिक्षण घेत असताना वेगवेगळे अभ्यासक्रम करा.
* अभियांत्रिकी क्षेत्रात संशोधन विषयावर काम करा.

## ❇ ज्ञानसेतू प्रशिक्षण ❇

दि. ६ व ७ फेब्रुवारीला ज्ञान प्रबोधिनी प्रशालेमध्ये 'ज्ञानसेतू' अंतर्गत युवक–युवतींसाठी विज्ञान प्रयोगांचे प्रशिक्षण घेण्यात आले. प्रशिक्षणाची सुरुवात पद्यांनी झाली. प्रबोधिनीच्या पूर्वाताईंनी व आशुतोषदादाने उत्तम प्रकारे प्रयोग करून दाखवले व ते युवक–युवतींकडून करवून घेतले. दुसऱ्या दिवशी सगळ्यांनी पूर्वाताई व आशुतोषदादाच्या मार्गदर्शनाखाली प्रयोगांचे संच (कीट) तयार केले. शाखा रचनेच्या भागांनुसार गट करण्यात आले. पहिल्या दिवशी जे प्रयोग ताईदादाने दाखवले होते, त्या प्रयोगांचे प्रत्येक गटाने नवनवीन पद्धतीने सादरीकरण केले. यातून विज्ञानातील अनेक संकल्पना सोप्या प्रयोगांच्या माध्यमातून समजावून घेऊ शकतो. या संकल्पना समजावून घेण्यासाठी परिपूर्ण प्रयोगशाळा हवी, महागडी उपकरणे हवीत असा कोणताही आग्रह न धरता सहज उपलब्ध होणाऱ्या साहित्याचा उपयोग करून प्रयोग करता येतात, संकल्पना समजावून देता येतात हा आत्मविश्वास प्रशिक्षणार्थ्यांच्या मनात निर्माण झाला. विशेष म्हणजे या प्रशिक्षणास जे युवा कार्यकर्ते उपस्थित होते त्यापैकी फक्त दोघेच विज्ञान विषयाचा अभ्यास करत आहेत, उर्वरित सर्व वाणिज्य व कला शाखेचे विद्यार्थी होते. तरीही प्रशिक्षण घेताना कोणालाही कंटाळा आला नाही. फक्त विज्ञान प्रयोगच नाहीत तर खेळ, गोष्ट, पद्य यांच्या साहाय्याने विद्यार्थ्यांना गुंतवून कसे ठेवावे हेही युवा कार्यकर्त्यांनी अनुभवले. वैज्ञानिक तत्त्व सोप्या पद्धतीने सांगता येणे हेही एक कौशल्य आहे. त्याचाही विचार झाला. खरंतर त्यामुळेच हे प्रशिक्षण सर्वांना आवडले.







# ✻ शाखा विभाग ✻

## ✻ शिवसूर्य दिन -

शिवजयंती व रथसप्तमीचे निमित्त साधून 'स्व'-रूपवर्धिनीच्या सर्व शाखांनी १९,२२१ सूर्यनमस्कार घालण्याचा संकल्प केला होता. दि. १९ फेब्रुवारीला शिवजयंती व रथसप्तमी एकत्र आल्याने 'शिवसूर्य दिन' साजरा झाला. वर्धिनीच्या सर्व शाखा, महिला विभाग, उत्थान विभाग, वर्धिनीचे कार्यकर्ते व परिसरातील नागरिक सर्वांनी सकाळी ७ ते ९ या वेळात मंत्रोच्चारात सूर्यनमस्कार घातले. या उपक्रमात ६०० पेक्षा जास्त व्यक्ती सहभागी झाल्या व सूर्यनमस्काराची एकूण संख्या ३५,४५७ झाली. (वय वर्षे ६ पासून ज्येष्ठांपर्यंत). सूर्यनमस्कारातून संपूर्ण शरीराला व्यायाम होतो. यामुळे दैनंदिन १३ सूर्यनमस्कार घालण्याचा संकल्प सर्व युवकांनी व महिलांनी केला. सर्व शाखांवर शिवप्रतिमेचे पूजन व शिववंदना घेण्यात आली.










## ✻ भगिनी निवेदिता शाखा -

शिवजयंतीनिमित्त छत्रपती शिवाजी महाराजांच्या आयुष्यात घडलेल्या प्रसंगाचे वर्णन, पोवाडा, कविता, वक्तृत्व, गायन अशा कलांचे सादरीकरण करण्याची स्पर्धा झाली. समृद्धी ताईने पन्हाळ्याच्या वेढ्याची गोष्ट सांगितली.

८ फेब्रुवारीला आगरकर प्रशालेमध्ये शाखेची जोरदार सुरुवात झाली. मुलींना औक्षण करून त्यांचे स्वागत केले. मैदान जोशात झालं. सुरेश दादाने कृतीसत्र घेतले.

१३ फेब्रुवारीला हळदीकुंकू समारंभ, पालकांचे खेळ घेण्यात आले. रोजच्या कामातून काहीतरी वेगळंपण व डोक्यात असलेले ताण बाहेर टाकून पालक मनसोक्त खेळत होते. किरण ताई व मनीषाताईंनी पालकांशी गप्पा मारल्या.

सौ. जया राऊत या पालकांनी गाणे सादर केले.

२० फेब्रुवारीला कृतीसत्रात रोहितदादाने सुरेख उपक्रम घेतले. यातून गट बांधणी कशी करावी, व्यवस्थापन कसे करावे या गोष्टी मुलींना शिकायला मिळाल्या.

२८ फेब्रुवारीला विज्ञान दिनानिमित्त लताताईंनी मुलींशी ऑनलाईन पद्धतीने संवाद साधला. विज्ञानदिनाची माहिती व वैज्ञानिकांच्या गोष्टी सांगितल्या.



**❋ स्वामी श्रद्धानंद शाखा -**

मैदान विभाग - दररोज खेळ सुरू होण्याआधी आणि संपल्यानंतर व्यायाम व सूर्यनमस्कार होतात. नवीन आलेल्या मुलांसाठी वेगळे खेळ आणि मैदानी उपक्रम होत आहेत.

शाखेच्या व्हॉटस्‌ॲप गटावर मुलांना रोजचा अभ्यास पाठवला जातो. त्याचबरोबर प्रत्येक युवकाकडून एक सुविचार, एक बोधकथा, एक पर्यटनस्थळ, एक ठळक बातमी पाठवली जाते. तसेच त्यांना गणिताचे किंवा विज्ञानाचे एक कोडे दिले जाते. शाखेत येताना मुले ते सोडवून आणतात. १० वीतील वर्धकांची सराव परीक्षा चालू आहे.

कार्यक्रम विभाग - २६ जानेवारी रोजी मुलांना प्रजासत्ताक दिनाची माहिती ऑनलाईन पद्धतीने सांगितली गेली. श्रीराममंदिर जन्मभूमी, अयोध्या निधी संकलनाच्या कार्यक्रमात युवकांसोबत मुलांनी देखील सहभाग घेतला.

**❋ समर्थ रामकृष्ण शाखा -**

१२ जानेवारीला शाखेत सौरभ म्हस्के दादाने स्वामी विवेकानंदांच्या तसेच राजमाता जिजाबाईंच्या जयंतीनिमित्त अभिषेक मुळे दादाने माहिती सांगितली.

३० जानेवारीला शाखेत लहान गटावर 'माझी आई' या विषयावर निबंध स्पर्धा घेण्यात आली. तसेच मोठ्या गटावर हस्ताक्षर स्पर्धा आणि निबंध स्पर्धा घेण्यात आली.

**❋ क्रांतिज्योती सावित्री शाखा -**

१ फेब्रुवारीला चित्रकला स्पर्धा झाली. चित्र काढण्यासाठी कोणते विषय दिले नव्हते. मुलींनी फक्त निसर्गचित्र न काढता वेगवेगळ्या विषयांवर चित्रे काढली व त्यातून क्रमांक दिले.

२ फेब्रुवारीला सुरेशदादाने खेळ, उपक्रम व नवीन पद्य घेतले. छोट्या छोट्या खेळांमधून खूप काही शिकायला मिळालं.

३ फेब्रुवारीला मुलींना 'फत्तेशिकस्त' हा सिनेमा दाखवण्यात आला आणि त्यावर चर्चा घेतली.

४ फेब्रुवारीला सायलीताई गुरव हिने 3D भेटकार्ड तयार करायला शिकवले.

५ फेब्रुवारीला लताताईने 'गणिताच्या गंमती' हे सत्र घेतले. घरातील जुने कॅलेंडर सर्वजण घेऊन आले होते. त्या कॅलेंडरमधून वेगवेगळे उपक्रम घेतले. लिओनार्डोव्हिन्सी यांच्याबद्दल व त्यांनी केलेल्या वैज्ञानिक संशोधनाबद्दल ताईंनी मुलींना माहिती सांगितली.

६ फेब्रुवारीला दोन गटात नाटक स्पर्धा स्पर्धा घेतली. दोन्ही गटाला विषय सांगितले नव्हते. तरीही दोन्ही गटांनी खूप छान नाटक सादर केले. एका गटाने खूप हसवले तर एका गटाने चालू परिस्थितीची जाणीव लक्षात घेऊन नाटक सादर केले. त्यामुळे खूप नवीन चेहरे समोर आले.



## ❋ उत्थान विभाग ❋

**❋ ऋतुरंग चित्रकला स्पर्धा -**

२५ जानेवारीला अभ्यासिकेतील मुलांसाठी आर. एस्. बी. (RSB) फौंडेशनने चित्रकला स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेमध्ये कसबा नगर, महात्मा फुले नगर, लष्कर, भवानी नगर आणि ताडीवाला रोड या भागांमधील १६ अभ्यासिकेतील २०० जणांनी सहभाग घेतला. या स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ ३ फेब्रुवारीला वर्धिनीत झाला. आर. एस्. बी. (RSB) फौंडेशनचे प्रतिनिधी श्री. चेतन कुसाळकर आणि विभाग प्रमुख श्री. उमेश माळेकर यांच्या हस्ते मुलांना बक्षिसे देण्यात आली. या कार्यक्रमासाठी पालकही उपस्थित होते.

**❋ शिवजयंती -**

१९ फेब्रुवारीला शिवजयंतीनिमित्त कसबा भागातील मुलांनी नूमवि प्रशालेतील राष्ट्रीय कला अकादमीच्या रांगोळी प्रदर्शनास भेट दिली. यातून रांगोळी रेखाटन या कलेतील वेगवेगळ्या पद्धती मुलांना समजल्या. २० फेब्रुवारीला शिवरायांच्या जीवनावर आधारित नाट्य, पोवाडा यांचे सादरीकरण वर्धिनीच्या माडगांवकर सभागृहात झाले. सादरीकरणाच्या वेशभुषेत वापरलेली वाघनखे, कट्यार ही साधने मुलांनी स्वतः कागदापासून

बनवली होती.

**❊ क्षेत्रभेट -**

२१ फेब्रुवारीला पंचशील व प्रियदर्शिनी अभ्यासिकेतील मुलांनी तळजाई पठाराला भेट दिली. एका वेगळ्या जंगल सफारीचा आनंद मुलांना मिळाला. वेगवेगळे पक्षी, त्यांचे आवाज, झाडांच्या विविध जाती, वेगवेगळी फुले अशी जैवविविधता मुलांना बघायला मिळाली. विशेष म्हणजे पठारावर आलेला तरुण मुलांचा व महिलांचा गट मुलांची पद्ये, गाणी, घोषणा ऐकून त्यांच्यासोबत पुढील खेळात सहभागी झाला. मुलांशी गप्पा मारताना वर्धिनीच्या कामाबद्दलची त्यांनी माहिती करून घेतली आणि या कामात सहभागी होण्याची इच्छा व्यक्त केली.

याशिवाय दररोजच्या ई-अभ्यासिकेसोबतच शनिवारवाडा, तिकोना बाग भेट, जिजामाता जयंती, विवेकानंद जयंती, सावित्रीबाई फुले जयंती हे उपक्रम साजरे झाले.








## ❊ ग्रंथालय विभाग ❊

**❊ विभागातल्या सौ. मोनालीताई यंदे यांचे मनोगत -**

१ फेब्रुवारी पासून ग्रंथालयात जाऊ लागले. ग्रंथालय म्हटलं की पुस्तके आलीच. सगळीकडे पुस्तकेच पुस्तके पाहून आपण यातले कोणते पुस्तक प्रथम वाचावे, हे पुस्तक वाचावे की ते, असा गोंधळ उडत होता. पहिले एक-दोन दिवस पुस्तके चाळण्यात गेले.

शाखेतील मुलांसाठी कोणती पुस्तके घ्यावीत हा विचाराने वेगवेगळी पुस्तके अलगद बाजूला पडू लागली. यातून 'चतुर बिरबल, प्राण्यांच्या गोष्टी, टागोरांच्या गोष्टी, बोधकथा, छानदार गोष्टी, सिंहासन बत्तीशी, संतांच्या नवलकथा, आजी आजोबांची पत्रे, काटेमुंढरीची शाळा' अशा ६०-७० पुस्तकांची निवड केली.

रोज एका शाखेत जाऊन मुलांना वाचनाबद्दल थोडीशी माहिती सांगून मुलांचा कल पुस्तक वाचण्याकडे कसा येईल हे पाहू लागले व मुलांना पुस्तकांची देवाण-घेवाण सुरू झाली. यामुळे नवनवीन पुस्तकांची नावे सांगून ताई हे पुस्तक मिळेल का असे विचारू लागली. काही मुली एका वेळेस दोन पुस्तकांची मागणी करत होत्या तर मुलांना विज्ञानावरील पुस्तके हवी होती.

भगिनी निवेदिता शाखेतील जान्हवी परदेशी म्हणाली, ''ताई, माणूस प्राण्यांकडून काय शिकतो, हे पुस्तक मला हवे आहे. तर ते मिळेल का ?'' मुले पुस्तकांची मागणी करताहेत हे ऐकून मनाला हायसे वाटले. जान्हवी गायकवाड या मुलीने 'मासोळी आणि चिमुकलं पाखरू' हे पुस्तक नेले होते. ते एका दिवसात वाचून लगेचच दुसरे पुस्तक मागू लागली.

**❊ वाचन कट्टा -**

१० फेब्रुवारीपासून रामकृष्ण शाखेत वाचनकट्टा घेतला. इंग्रजी माध्यमात शिकणारी मुले देखील मराठी वाचण्याचा प्रयत्न छान करत होते. जवळजवळ एक तास हा वाचनकट्टा चालला. एक गोष्ट किंवा पान वाचल्यानंतर त्यातून आपल्याला काय समजले हे मुले सांगत होती. मुलांनी मनापासून वाचनकट्ट्यात सहभाग घेतला.

१३ फेब्रुवारी रोजी भगिनी निवेदिता शाखेत देखील वाचन कट्टा मस्त रंगला. मुलींना वाचनाची खूपच आवड आहे. मुली मन लावून गोष्टी ऐकत होत्या.

सावित्री शाखेतील मुलींचे पहिल्यापासूनच एक ग्रंथालय आहे. परंतु शाळा बंद असल्यामुळे पुस्तके वर्गातील कपाटातच आहेत. त्यामुळे माझ्याकडील पुस्तके मुलींनी पटापट घेतली. मुली खूपच उत्साही आहेत. नूतन कांबळे हिने वाचलेल्या पुस्तकांची नावे सांगितली. श्रद्धा काकडे हिने 'श्यामची आई' हे पुस्तक घेतले होते त्यातील वाचलेली गोष्ट पुढे येऊन मुलींना सांगितली व या गोष्टीतून काय बोध घेतला हेही सांगितले. हे

ऐकल्यावर एक मुलगी म्हणाली, 'माझी आई कामाला जाते तेव्हा मी स्वयंपाक करून ठेवते' अशी आईबद्दलची कृतज्ञता तिने व्यक्त केली. श्रद्धानंद शाखेतील मुलांनी पुस्तके घेऊन वाचली. मी पुस्तके देऊन तिथेच बसले होते. एक मुलगा पुस्तक बदलण्यासाठी आला त्याच्यासोबत दादा देखील होता. बाजूला काही टवाळखोर मुले हे बघत होती. त्या मुलांना पाहून दादा मला म्हणाला की 'ताई तुम्ही इथे नका बसू, चला तिकडे. ही मुले चांगली नाहीत'. हे ऐकून मला वाटले आता फक्त काहीच दिवस झाले. आपण इथे येतो परंतु किती आपलेपणा निर्माण झालाय या मुलांच्यात आपल्याबद्दल! आणि हे काम फक्त आपल्या शाखेतील मुलेच करू शकतात याचा अभिमान वाटला. **काहीच दिवसांचा परिचय पण मुलांना वाटणारा आपलेपणा बघून माझे मन भरून आले.**

## ❊ पाकोळी बालवाडी ❊

**❊ शिवजयंती -**

हा उत्सव विद्यार्थ्यांच्या घरात उत्साहाने साजरा झाला. शिवाजी महाराजांच्या जीवनातील गोष्टी, पोवाडे यांचे सादरीकरण झाले. त्यांच्या चित्रफीती (व्हिडिओ) पालकांनी गटावर पाठवल्या. श्रीनिवासने अफझलखानाचा वध ही गोष्ट व ओवी यंदे आणि समर्थ काळे यांनी पोवाडा सादर केला.

**❊ विज्ञानदिन -**

मोठ्या गटातील मुलांनी 'जलचक्र' या गाण्यावर अभिनय गीत सादर केले. विज्ञान दिन सप्ताह पालक गटावर विज्ञान प्रयोगांच्या चित्रफीती (व्हिडिओ) पाठवून साजरा झाला. १) शरीराच्या अवयवांची ओळख २) गार-गरम स्पर्श ३) पारदर्शक-अपारदर्शक संकल्पना ४) तरंगणे-बुडणे संकल्पना ५) ज्वलनास हवेची गरज असते ६) मूळ रंगांची ओळख ७) लोहचुंबक ८) चवींचा परिचय, हे प्रयोग पालकांनी मुलांकडून करून घेतले. त्यांच्या चित्रफीती (व्हिडिओ) शिक्षक गटावर आल्या आहेत. शिक्षिकांनी मुलांशी वैयक्तिक दूरध्वनीवरून संपर्क करून त्यांचे कौतुक केले.







## ❋ बचतगट ❋



**❋ सर्व भागांमध्ये संक्रांत हळदी कुंकु समारंभ साजरा झाला. या कारणाने परिसरातील महिला बचत गटाच्या संपर्कात आल्या. त्यातील काही विशेष -**

१ फेब्रुवारीला अप्पर इंदिरानगर येथील दयानंद बचतगटाचा संक्रांतीचा हळदीकुंकु समारंभ झाला. त्या भागातील नगरसेविका सौ. शिळीमकर ताई उपस्थित होत्या. त्यांनी महिलांना व्यवसाय करण्यासाठी प्रोत्साहन दिले आणि त्यासाठी मदत करण्याचेही आश्वासन दिले.

१० फेब्रुवारीला वर्धिनीच्या परिसरातील बचत गटातील महिला हळदी कुंकु समारंभासाठी एकत्रित आल्या. महिलांचे मनोरंजनात्मक खेळ झाले. श्रीमती बागेश्री पोंक्षे ताईंनी बचत गटातून एकत्र येऊन काम करणाऱ्या उद्योजक संस्थांची माहिती सांगितली. यातून बचतगटाचे फायदे महिलांच्या लक्षात आले.

१६ फेब्रुवारीला आशानगर येथील रणरागिणी बचत गटाने हळदीकुंकू व परिसरातील लहान मुलांचे बोरनहाण केले. काही महिलांनी हा अनुभव प्रथमच घेतला. उपस्थित महिलांना सौ. मंजुषा कुलकर्णी ताईंनी 'स्व'-रूपवर्धिनीच्या कामाचा परिचय करून दिला.

## ❋ विज्ञान तंत्रज्ञान फिरती प्रयोगशाळा ❋

या विभागाच्या वतीने २ नोव्हेंबर ते १ डिसेंबर २०२० या कालावधीत दिवाळीनिमित्त खास स्पर्धा 'आभाळाशी जोडू नाते (Touch the Sky)' चे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत ड्रोन संदर्भातील दररोज १ याप्रमाणे ३० प्रश्न विचारले गेले. या स्पर्धेमध्ये प्रत्यक्ष ३८ शाळांनी तर अप्रत्यक्ष ६४ शाळांनी सहभाग घेतला. एकूण सहभागी विद्यार्थी २२१५. शाळांनी १९६ निवडक उत्तरपत्रिका पाठवल्या. त्यामधून विजेत्यांची शाळानिहाय प्रथम, द्वितीय, तृतीय आणि उत्तेजनार्थ क्रमांक निवडले. ज्ञानदा विद्यालय, किरकटवाडी, ता. हवेली, जि. पुणे येथील बक्षीस वितरण कार्यक्रमास माजी खासदार श्री. अशोक (आण्णा) मोहोळ यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविले. टाटा मोटर्स पुणेच्या इ.आर.सी. (Engineers Research Center) विभागाचा सहभाग उल्लेखनीय होता.

**❋ विजेत्यांची नावे पुढीलप्रमाणे -**

१) सायली नामदेव भोकसे - राष्ट्रीय विद्यालय, कुरकुंडी, ता. खेड, जि. पुणे, इ. १० वी, प्रथम क्रमांक
२) समृद्धी रमेश भोकसे - राष्ट्रीय विद्यालय, कुरकुंडी, ता. खेड, जि. पुणे, इ. १० वी, द्वितीय क्रमांक
३) अश्विन विनायक यादव - ज्ञानदा प्रशाला किरकटवाडी, ता. हवेली, जि. पुणे, इ. १० वी, द्वितीय
४) अथर्व अमोल कुलकर्णी - बालक मंदिर संस्था, इंग्लिश मिडियम स्कूल, कल्याण, जि. ठाणे, ९ वी, द्वितीय
५) साक्षी बंडोजीराव शिंदे - रामचंद्र गायकवाड विद्यालय, दिघी, ता. हवेली, जि. पुणे, १० वी, द्वितीय
६) कौस्तुभ नितीन साळुंके - रामेश्वर विद्यालय विंग, ता. खंडाळा, जि. सातारा, ८ वी, द्वितीय
७) नेहा उत्तम मैती - बालक मंदिर संस्था, इंग्लिश मीडियम स्कूल, कल्याण, जि. ठाणे, तृतीय
८) संकेत रामभाऊ वरपे - मामासाहेब मोहोळ विद्यालय, मुठा, ता. मुळशी, जि. पुणे, १० वी, तृतीय
९) आकांक्षा विद्यासागर माटे - ज्ञानदा प्रशाला किरकटवाडी. ता. हवेली, जि. पुणे, ९ वी, तृतीय
१०) सोनल कैलास सुतार - आदर्श विद्यालय अंबोली, ता. खेड, जि. पुणे, ९ वी, तृतीय
११) द्वारका सूर्यकांत राचेवार - श्री संत मुक्ताबाई माध्यमिक विद्यालय, सोळू, ता. खेड, जि. पुणे, १० वी, तृतीय
१२) निखील शिवाजी राळे, राष्ट्रीय विद्यालय, कुरकुंडी, ता. खेड, जि. पुणे, १० वी, उत्तेजनार्थ
१३) हेमांगी मनोहर शेरीकार, न्यू इंग्लिश स्कूल, वरवे, ता. भोर, जि. पुणे, १० वी, उत्तेजनार्थ
१४) भूमिका रोहिदास सावंत, आदर्श विद्यालय, अंबोली, ता. खेड, जि. पुणे, ९ वी, उत्तेजनार्थ
१५) मानसी उमेश पाटोळे, भैरवनाथ विद्यालय, दोंदे. ता. खेड, जि. पुणे, १० वी, उत्तेजनार्थ
१६) मानस सुनील शेवाळे, कॅ. रविंद्र माधव ओक हायस्कूल, कल्याण (प.), जि. ठाणे, ९ वी, उत्तेजनार्थ

**❋ प्रतिक्रिया -**

**❋ निधी सुभाष कुलकर्णी (कॅ. र. मा. ओक हायस्कूल कल्याण, इ. ९ वी.)**

या स्पर्धेमुळे वेगवेगळ्या माध्यमातून ड्रोनसंबंधी माहिती मिळाली. एक उपयोगी तसेच आजच्या जीवनशैलीसाठी गरजेचे असे एक डिजिटल साधन म्हणून ड्रोन उपयोगी आहे. ड्रोनचे उपयोग, उदाहरणे यासंबंधी उपयुक्त माहिती आम्हाला मिळाली. तसेच अशा प्रकारच्या नवनवीन स्पर्धांमध्ये भाग घेण्यास नक्की आवडेल ज्यामुळे शिक्षणासोबतच विविध माहिती मिळण्यास मदत होईल.

**❋ आदिती संजय जगताप (न्यू इंग्लिश स्कूल, वरवे, ता. भोर, जि. पुणे, इ. १० वी.)**

'स्व'–रूपवर्धिनी विज्ञान तंत्रज्ञान फिरती प्रयोगशाळा ही एक संस्था नसून सहवासातून शिक्षण देणारा परिवार आहे. स्पर्धेचे आयोजन व विषय निवड यामुळे आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती तसेच विज्ञानाची अद्ययावत माहिती संस्थेच्यामुळे मिळत आहे. या प्रश्नावली सोडवताना मी खूप उत्सुक असते. कारण बुद्धीला चालना देणारे प्रश्न आणि त्यातून मिळणारे बक्षीससुद्धा काही संपणारी तुटणारी भौतिक वस्तू नसून कायम आपल्यासोबत जिवंत राहणारा एक अविस्मरणीय अनुभव आहे. वैज्ञानिकाशी संवाद साधण्याची संधी, मोठ्या प्रकल्पांना भेटी या प्रकारचा अनुभव घेण्याची संधी संस्थेमुळे मिळाली. मी खूप आभारी आहे.

**❋ सौ. उमा शिरगुरकर, शिक्षिका (कॅ. र. मा. ओक हायस्कूल, कल्याण (प.)**

आपल्या सर्वांना माहीतच आहे कोविड–१९ या विषाणूने सर्व जगभर थैमान घातलं आहे आणि आपल्या संपूर्ण जीवनावर त्याचा परिणाम झाला आहे. त्यामुळे सर्व विद्यार्थी कंटाळलेले आहेत. असे असताना काळाची गरज लक्षात घेऊन 'स्व'–रूपवर्धिनीने 'आभाळाशी जोडू नाते' 'Touch the Sky (Drone)' प्रश्नमंजुषा स्पर्धा घेतली. या स्पर्धेचे वैशिष्ट्य म्हणजे प्रश्नांची मांडणी अशी होती की ड्रोनची सर्व माहिती म्हणजे रचना, कार्य, उपयोग इ. स्पर्धकाला मिळाली. मला सांगायला अतिशय आनंद होतो की आमच्या शाळेतील इ. ९ वीतील विद्यार्थी सोहम अरुण चव्हाण याने ड्रोनची प्रतिकृती तयार केली. 'स्व'–रूपवर्धिनीने या काळात योजलेला हा उपक्रम अतिशय स्तुत्य असून कार्यकर्त्यांची विद्यार्थ्यांसाठीची तळमळ यातून दिसून येते. त्याबद्दल मी आयोजकांना धन्यवाद देते.

**❋ 'स्व'–रूपवर्धिनी निधी संकलन विभागातील श्री. चंदन डाबी यांचे मनोगत –**

पुण्यापासून काही अंतर गेल्यावर ग्रामीण भागातील शाळा आणि शहरातील शाळा यांमधील शैक्षणिक सुविधातील तफावत स्पष्टपणे जाणवते. विद्यार्थ्यांमधील बुद्धिमत्ता आणि त्यांचे कुतुहल याला योग्य संधी मिळावी म्हणून 'स्व'–रूपवर्धिनी विज्ञान तंत्रज्ञान फिरती प्रयोगशाळा, सातत्याने आणि नावीन्यपूर्ण उपक्रम योजत असते. त्यातीलच एक भाग म्हणजे आंबोली तालुक्यातील खेड येथील गुणगौरव समारंभ. १० फेब्रुवारीला प्रमुख पाहुणे म्हणून या कार्यक्रमाचा माझा अनुभव अविस्मरणीय होता. विज्ञान शिक्षक आणि मुख्याध्यापकांची तळमळ आणि विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग पाहून मी भारावून गेलो.

'ध्वनी विज्ञान', 'जाणूया कोरोनाला, जाणूया विषाणूला, दूर ठेवू आजारांना' आणि 'आभाळाशी जोडू नाते' (Touch the Sky, Drone) या स्पर्धांमध्ये सहभाग घेतलेले गुणवंत विद्यार्थी सामान्य कुटुंबातील होते. सुविधा व साधनांचा अभाव असताना, कसे आणि का या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठीची त्यांची धडपड पाहून वर्धिनीच्या कामाची आवश्यकता अधिक ठळकपणे जाणवली. अशा विद्यार्थ्यांना प्रोत्साहन म्हणून शिष्यवृत्ती देणे हे सर्वथा योग्य आहे हेही समजले. शास्त्रज्ञांबाबत आणि त्यांच्या संशोधनासंदर्भात बोलताना विद्यार्थी अतिशय एकाग्रपणे ऐकत होते. त्यांच्या डोळ्यातील चमक भावी शास्त्रज्ञाची प्रतिमा दर्शवत होती. या जाहीर कार्यक्रमानंतर त्यांच्या घरी संपर्कासाठी गेलो असता काही मुले, मुली ५–६ किमी अंतर चालत येतात. एका मुलीचे घर कुडाचे, त्याला चांगल्या प्रकारे मातीने सारवलेले होते. तिच्या समस्या आणि तिने प्राप्त केलेले यश पाहून खूपच प्रभावित झालो.

---

## ❋ श्रद्धांजली ❋

* शेठ हिरालाल सराफ प्रशालेतील शिक्षक **श्री. जनार्दन दिनकर शेंडे** यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. वर्धिनीत काही वर्षे ते विज्ञान विषय शिकवायला येत होते.
* ज्ञानप्रबोधिनीचे ज्येष्ठ कार्यकर्ते, संस्कृतचे गाढे अभ्यासक आणि वर्धिनीचे मार्गदर्शक **श्री. वामन नारायण तथा भाऊ अभ्यंकर** यांचे दीर्घ आजाराने निधन झाले.

**वर्धिनीचा परिवार या सर्वांच्या कुटुंबियांच्या दुःखात सहभागी आहे.**

❖❖❖